MHNS190001932017

| | | |
|---|---|---|
| खटला दाखल दिनांक | - | ०१.०२.२०१७ |
| खटला नोंदणी दिनांक | - | ०१.०२.२०१७ |
| खटला निकाल दिनांक | - | ३०.०७.२०२६ |
| निकालाची अवधी | - | व. म. दि. |
| | | ०९ ०५ २९ |

| | |
|---|---|
| | <u>**येवला येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, यांचे न्यायालयात**</u><br>**(पिठासिन अधिकारी डी. एम. गुलाटी)**<br>**नियमित फौजदारी खटला क्र.५६/२०१७ नि.क्र.४३** |
| | (प्रथम खबर I-१७३/२०१६, भा.द.वि कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे. |
| फिर्यादी | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फतः ठाणे अंमलदार,<br>येवला तालुका पोलीस स्टेशन, येवला,<br>जि. नाशिक. |
| तर्फे | विव्दान विधिज्ञ श्री. एस.एस.भाटे |
| आरोपी | **१. पोपट बाळाजी शिंदे,**<br>वय –७० वर्षे,<br>**२. छबाबाई पोपट शिंदे,**<br>वय- ६५ वर्षे,<br>**३. शांताराम पोपट शिंदे,**<br>वय- ३० वर्षे,<br>सर्व रा. जळगाव नेउर, ता. येवला,<br>जि. नाशिक. |
| तर्फे | विव्दान विधिज्ञ श्री. एस.एस.भावसार |

| | | |
|---|---|---|
| घटना घडल्याची तारीख | : | २८.११.२०१६ |
| प्रथम खबर दिनांक | : | २९.११.२०१६ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याची दिनांक | : | ०१.०२.२०१७ |
| न्यायालयाने दोषारोप निश्चित केल्याची दिनांक | : | १२.११.२०१९ |
| पुरावा सुरु झाल्याची दिनांक | : | १२.११.२०१९ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याची दिनांक | : | -- |

| | | |
|---|---|---|
| न्यायनिर्णय दिनांक | | ३०.०७.२०२६ |

<u>आरोपींचा तपशील</u>

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याची दिनांक | जामिनावर मुक्तता केल्याची तारीख | गुन्हयाची कलमे | आरोपीस शिक्षा करण्यात आली किंवा निर्दोष ठरविण्यात आले | देण्यात आलेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ करीता संपरिक्षे दरम्यान आरोपीने कारागृहात घालविलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **पोपट बाळाजी शिंदे** | ०२.१२.२०१६ | ०२.१२.२०१६ | भा.द.वि. चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे | निर्दोष | --- | --- |
| २. | **छबाबाई पोपट शिंदे** | ०२.१२.२०१६ | ०२.१२.२०१६ | | निर्दोष | --- | --- |
| ३. | **शांताराम पोपट शिंदे** | ०२.१२.२०१६ | ०२.१२.२०१६ | | निर्दोष | --- | --- |

**अ) अभियोगपक्षाचे साक्षीदार -**

| **क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **निशाणी क्र.** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|---|
| १. | अनिल अंबादास शिंदे | ३९ | फिर्यादी |

**ब) बचाव पक्षाचे साक्षीदार -**

| क्र. | साक्षीदाराचे नाव | निशाणी क्र. | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| | निरंक | | |

क) न्यायालयीन साक्षीदार -

| क्र. | साक्षीदाराचे नाव | निशाणी क्र. | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| | निरंक | | |

अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालयीन कागदपत्रांची यादी व निशाण्या

अ) अभियोगपक्ष -

| क्र. | दस्तऐवजाचा तपशिल | निशाणी क्र. |
|---|---|---|
| १. | फिर्याद | निरंक |
| २. | वैदयकीय प्रमाणपत्र | ४० |
| ३. | घटनास्थळ पंचनामा | ४१ |

ब) बचावपक्ष -

| क्र. | दस्तऐवजाचा तपशिल | निशाणी क्र. |
|---|---|---|
| | निरंक | |

क) न्यायालयीन दस्तऐवज -

| क्र. | दस्तऐवजाचा तपशिल | निशाणी क्र. |
|---|---|---|
| | निरंक | |

ड) जप्त मुद्देमाल -

| क्र. | वस्तुंचा तपशिल | आर्टीकल क्र. |
|---|---|---|
| १ | एक बाभळी काठी ३.१/२ फुट लांबीची जुनी वापरती असलेली. | (जी.एम.आर.क्र.३५/२०२४) |

## न्यायनिर्णय

## (निकाल तारीख ३० जुलै, २०२६)

आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान चे कलम ३२४, ३२३, ५०४,

५०६ सह कलम ३४ अन्वये दोषारोप ठेवण्यात आले आहेत.

<u>अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात खालील प्रमाणे आहे</u>-

२. घटना ही दि.२८/११/२०१६ रोजी १८:०० वाजताचे सुमारास फिर्यादी त्यांचे शेतातुन घरी जात असताना त्यांचे शेजारी शेती असणारे त्यांचे भाउबंध यांनी शेतीचे जुने भांडणाचे कारणावरुन कुरापत काढुन त्यांचे चुलत चुलते आरोपी क्र. ३ शांताराम पोपट शिंदे व आरोपी क्र. १ पोपट बाळाजी शिंदे हे त्यांच्या जवळ आले व म्हणाले की, फार माजला आहे तु विनाकारण शेतीचे कारणावरुन भांडण करतो, असे म्हणुन चुलत आजोबा आरोपी क्र. १ पोपट बाळाजी शिंदे यांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यावेळी आरोपी क्र. ३ शांताराम पोपट शिंदे याने त्याचे हातातील लाकडी काठीने डावे हातावर, पाठीवर मारुन दुखापत केली. त्यावेळी आरोपी क्र. १ पोपट बाळाजी शिंदे यांची बायको आरोपी क्र. २ छबाबाई पोपट शिंदे हिने वाईटसाईट शिवीगाळ केली व म्हणाले की, तुझ्याच्याने काय होईल ते तु कर तु जर पुन्हा आमच्याशी भांडण केले तर तुला मारुन टाकु असा दम दिला. त्यावेळी भांडणाचा आवाज ऐकुन धावत येवुन फिर्यादीचे आजोबा महादु बालाजी शिंदे व आई संगिताबाई अंबादास शिंदे यांनी सोडवा सोडव केली. त्यानंतर त्यांनी पोलीस स्टेशनला येवुन मेडीकल यादी घेतली व ग्रामीण रुग्णालय येवला येथे उपचार घेतले. त्यानंतर फिर्यादीने आरोपींविरुध्द फिर्याद दाखल केली.

३. सदर फिर्यादीच्या अनुषंगाने येवला तालुका पोलीस स्टेशन, येवला, ता. येवला, जि. नाशिक येथे गु.र.नं.I-१७३/२०१६, भा.द.वि कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हयाची आरोपीं विरुध्द नोंद झाली. तपासिक अंमलदार आर.टी.तांदळकर यांनी त्यांचे तपासाअंती आरोपीं विरुध्द पुरावा मिळून आल्याने न्यायालयात दोषारोपत्र दाखल केले.

४. दोषारोपपत्राचे तथा दस्तऐवजाचे अवलोकन करुन नि.क्र.१७ अन्वये आरोपीविरुध्द कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये दोषारोप निश्चित केला, ज्याअर्थी आरोपीने गुन्हयास नाकबुली नि.क्र.१८ ते २० अन्वये दर्शविली व संपरिक्षेची मागणी केली.

५. आरोपीं विरुध्द गुन्हयात गोवणारा पुरावा नसल्याने त्याचे कलम ३१३(१)(ब) फौजदारी प्रक्रिया संहिता प्रमाणेचे बयान वगळण्यात आले.

६. अभियोगपक्ष व आरोपीपक्षाचा युक्तीवाद ऐकला व अभिलेखाचे अवलोकन केले असता, न्यायनिर्णयाकरिता खालील मुद्दे माझ्या निष्कर्षासाठी उपस्थित होतात व त्यावरील निष्कर्ष मी कारणांसह देत आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | दिनांक २८.११.२०१६ रोजी १८:०० वाजेच्या सुमारास जळगाव नेउर, ता. येवला, जि. नाशिक येथे आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीस लाकडी काठी जे की मृत्युस कारणीभुत होईल या हत्याराने मारहाण करुन दुखापत केल्याचे व त्यायोगे भा.द.वि कलम ३२४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नाही.** |
| ०२. | वरील तारखेस, वेळी, ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीस लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन दुखापत केल्याचे व त्यायोगे भा.द.वि कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नाही.** |
| ०३. | वरील तारखेस, वेळी, ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीस शिवीगाळ करुन अपमानीत केल्याचे व दुसरा गुन्हा करण्याकरीता अथवा सार्वजनीक शांतता भंग होणे करीता त्यांना प्रक्षोभित केल्याचे आणि त्यायोगे भा.द.वि कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नाही.** |
| ०४. | वरील तारखेस, वेळी, ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीस जिवे मारण्याची धमकी दिल्याचे व त्यायोगे भा.द.वि कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नाही.** |
| ०५. | आदेश काय? | **आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात** |

**आले अंतिम**
**आदेशानुसार.**

**- <u>का र ण मि मां सा</u> -**

**<u>मुद्दा क्र. १ ते ५ करीता</u> :-**

७. मुद्दा क्र.१ ते ५ हे एकमेकांशी संलग्नीत असल्याने चर्चेची पुनरावृत्ती टाळण्याकरीता त्यांना एकत्र चर्चेस घेत आहे. अभियोगपक्षाने आरोपींविरुध्दचे दोषारोप शाबीत करण्याकरीता फिर्यादी अनिल अंबादास शिंदे (सा.क्र.१) यास तपासले. त्यांनी त्यांचे साक्षीत असे सांगितले की, ते आरोपींना ओळखतात. आरोपी त्यांचे भाउबंद आहे. घटना कधी, कुठे व केव्हा घडली याबाबत त्यांना काही आठवत नाही. असे घडले नाही की, आरोपींनी शेतीचे जुने भांडणाचे कुरापत काढुन त्यांना लाकडी काठीने डावे हातावर, पाठीवर मारुन दुखापत केली. त्यांनी पोलीस स्टेशनला फिर्याद दिली होती. त्यांनी फिर्यादीवरील त्यांची सही ओळखली व त्यातील मजकुर माहित नसल्याचे सांगितले.

१३. या प्रकरणात अभियोग पक्षाने एक साक्षीदार तपासला. अनिल अंबादास शिंदे (सा.क्र.१) हे फिर्यादी आहे. अनिल अंबादास शिंदे (सा.क्र.१) यांनी त्यांच्या साक्षीत असे सांगितले की, आरोपी त्यांचे भाउबंद आहे. घटना कधी, कोठे व केव्हा घडली याबाबत त्यांना काही आवत नाही. फिर्यादीने त्यांच्या साक्षीमध्ये घटनेच्या दिवशी आरोपीने शेतीच्या जुने भांडणाच्या कारणावरुन कुरापत काढुन लाकडी काठीने, लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन शिवीगाळ व दमदाटी केली याबाबत काही सांगितले नाही. म्हणुन घटनेच्या दिवशी आरोपीने आपसात संगनमत करुन फिर्यादीस लाथाबुक्कयांनी, लाकडी काठीने मारहाण करुन शिवीगाळ व दमदाटी केली याबाबत शंका निर्माण होते. म्हणुन आरोपी संशयाचा फायदा मिळण्यास पात्र आहे. म्हणुन मी **मुद्दा क्र.१ ते ४** चे उत्तर नकारार्थी नोंदविते व **मुद्दा क्र. ५** करीता खालील आदेश पारित करते.

## आदेश

१. **आरोपी क्र.१ पोपट बाळाजी शिंदे, २. छबाबाई पोपट शिंदे, ३. शांताराम पोपट शिंदे** यांना भारतीय दंड विधान,१८६० मधील कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याच्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ चे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७-अ नुसार जामीन ची पुर्तता करावी.

३. आरोपींचे जामीनपत्र व बंधपत्र रद्द करण्यात यावे.

४. सदर गुन्हयातील मुद्देमाल एक बाभळी काठी ३.१/२ फुट लांबीची जुनी वापरती असलेली मुल्यहीन असल्याने अपिल कालावधी संपल्यानंतर नियमाप्रमाणे नष्ट करण्यात यावे.

DEEPIKAKAUR MANMOHANSINGH GULATI

Digitally signed by DEEPIKAKAUR MANMOHANSINGH GULATI
Date: 2026.07.30 13:23:20 +0530

**स्थळ :- येवला.** **(डी.एम.गुलाटी)**

**दिनांक :-३०.०७.२०२६** **न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, येवला**

**जि. नाशिक.**